# महात्मा संत सेवालाल महाराजांना विनम्र अभिवादन!



गोरबंजारा समाजाचे मार्गदर्शक, सुधारक, संत सेवालाल अर्थात 'सेवाभाया' महाराजांचा जन्म 15 फेब्रुवारी 1739 रोजी गोलार डोडी तांडा (आंध्रप्रदेश) येथे झाला असे मानले जाते.

एकेकाळी केवळ भटकणारा, पशुपालन करणारा, बैलांच्या पाठीवर वाहतूक व व्यापार करणाऱ्या निरक्षर व अडाणी समाजाचा आत्मसन्मान आणि स्वाभिमान जागवण्यासाठी संत सेवालाल महाराजांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य अर्पण केले. संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचे स्वप्न पाहाणारे संत सेवालाल महाराज हे समता-बंधुता-एकतचे खंदे पुरस्कर्ते होते.

## विश्वात्मक प्रार्थना: बंधुतेचा अप्रतिम संदेश

प्रार्थनेचा पहिलाच शब्द 'कोरु' म्हणजे जे बंजारा नाहीत असे लोक. म्हणजे 'कोर' आणि 'गोर' या दोघांचेही कल्याण होवो, सर्व सजीवांचे कल्याण होवो, पापी आणि तापदायक गोष्टींपासून माझ्या लोकांना दूर ठेव – अशी प्रार्थना करणारे संत सेवालाल महाराज विविध समाजसमुहांच्या लोकांच्या सामुहिक कल्याणाचा विचार मांडतात आणि आपल्याला विश्वबंधुत्वाचा संदेश देतात.

> ***"कोरू गोरुन साई वेणो***
> ***जीव जीनगानीर साई व्हेस***
> ***किडी मुंगीर साई व्हेस***
> ***पापी चंडालेन दूर रकाडेस***
> ***झक्कडझोल हजारकोस***
> ***दुर टाळेस"***

## आत्मसन्मान जागा केला

प्रचंड गरीबी आणि निरक्षरतेमुळे ज्या लोकांनी आत्मविश्वास गमावला होता, पिढ्यानपिढ्या झालेल्या शोषणामुळे जे लोक भयंकर मानसिक गुलामीत जगत होते; अशा लोकांचा आत्मसन्मान जागा करण्याचे महान कार्य संत सेवालाल महाराजांनी केले. 'तुम्ही स्वत:च तुमच्या जिवनात प्रकाश पाडू शकता. तुम्ही कुणापेक्षाही कमी नाही. कसल्याही भोंदूगिरीच्या मागे जाण्यापेक्षा, कर्मकांडांमध्ये वेळ घालवण्यापेक्षा स्वत: कर्तुत्व करा आणि परिस्थिती बदला' असा स्वाभिमानी संदेश संत सेवाभायांनी आपल्याला दिला आहे.

> ***"तम सोता सोतारे जीवनेम दिवो***
> ***लगा सको छो***
> ***भजे पुजेम वेळ घालेपेक्षा करणी***
> ***करण वताओ"***

## शोषीत आणि गरीबांचे संत

शेकडो वर्षांपासून बलवान लोक गरीबांचे शोषण करत आहेत. स्वत:च्या स्वार्थासाठी गोरगरिबांवर अन्याय करणाऱ्या लोकांना संत सेवालाल महाराज खडसावून सांगतात की, 'गोरगरीबांवर अन्याय करणाऱ्याच्या सात पिढ्या नरकात जातील. जे कमजोर लोकांबरोबर राहातील त्यांना मी तारेल आणि अन्यायाचा नायनाट करेल.'

> ***"गोर गरीबेन दांडन खाये***
> ***ओरी सात पीडी नरकेम जाय"***

## समतेची शिकवण

जातीभेद आणि धर्मभेदामुळे माणसं माणसांपासून दुरावतात. कुणी स्वत:ला श्रेष्ठ तर कुणी कनिष्ठ समजत असेल तर कुणीच आनंदी राहू शकणार नाही. त्यामुळे कुणीही उच्च-नीच (नानक्या-मोटो) असा भेदभाव करू नये, असा समता-एकता आणि मानवतेचा संदेश संत सेवालाल महाराजांनी दिला आहे.

> ***"केनीबी नानक्या मोटो मत***
> ***समजो***
> ***कोई केती कमी छेई"***

## अंधविश्वासू बनू नका, विचार करा!

> *"मारी सिकवाडीपर ध्यान दो जाणजो, छाणजो पछज माणजो"*

कसलेही थोतांड आणि अंधविश्वासांवरती विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट ऐकल्यानंतर तिला पडताळून पहा, नीट विचारपूस करा. जर ती योग्य असेल तरच विश्वास ठेवा; असा वैज्ञानिक दृष्टीकोण संत सेवालाल महाराज देतात.

आज पावलोपावली लोकांची फसवणूक आणि दिशाभुल होत असताना, संत सेवालाल महाराजांच्या या संदेशावर चालण्याची नितांत गरज आहे.

## पाच पारारे पालन करजो

संत सेवालाल महाराजांनी त्यांची शिकवण पाच तत्वांच्या आधारे सांगितली आहे. हीच पाच तत्वे गौतम बुद्ध, संत रविदास महाराज, संत कबीर, संत नामदेव महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या शिकवणीतही पाहायला मिळतात. या सर्व संतांनी विविध काळात, विविध भाषांमध्ये एकच शिकवण दिलेली आहे. ही शिकवण आपल्याला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे.

१. *चोरी करू नका*
२. *हिंसा करू नका*
३. *व्यभिचार करू नका*
४. *खोटे बोलू नका*
५. *दारू पिऊ नका*

## संत सेवालाल महाराज आणि भारतीय संविधान




गरिबी आणि निरक्षरतेमुळे गुलामीचे जीवन जगणाऱ्या समाजाचा स्वाभिमान संत सेवालाल महाराजांनी जागा केला. हाच स्वाभिमान कायदेशीररित्या जपण्याचे काम भारतीय संविधान करत आहे. भारतीय संविधानात आपल्या संतांचे आणि सर्व समाजसुधारकांचे विचार आहेत.

संविधानामुळेच आज आपल्या मुलांना शिक्षणाचा आणि नोकरी करण्याचा अधिकार मिळालेला आहे. भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाचे कोणत्याही प्रकारच्या अन्याय आणि शोषणापासून रक्षण करते.

त्यामुळे संत सेवालाल महाराजांच्या स्वप्नातला समाज निर्माण होण्यासाठी संविधानाची योग्य अंमलबजावणी होणे नितांत गरजेचे आहे. त्यासाठी अधिकाधिक लोकांपर्यंत आपल्याला संत आणि संविधानाचा विचार पोहोचवावे लागेल. 'संविधान जागर अभियान' हे काम करत आहे. आपणही या प्रयत्नात सहभागी व्हा, असे प्रेमपूर्वक आवाहन.

**जय सेवालाल! जय संविधान!**

# संविधान जागर अभियान

**संविधान जागर अभियान निमंत्रक समिती:** मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, मा.न्या.ए.एम. ठिपसे, मा.न्या. टी.व्ही. नलावडे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

स्वप्निल फुसे: 79723 45764 | डॉ.श्याम मुडे: 94047 08852 | श्रद्धा रे. रा.: 92704 78335 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

samvidhan.jagar samvidhanjagar.org